परवानगी वर्ष : २० ०० - २००१

माध्यम : मराठी/~~उर्दू/इंग्रजी~~

विनाअनुदान/~~कायम विनाअनुदान~~

8206/98

जा.क्र. माध्य.३(१४)/प्रथम मान्यता/पुवि/२००१

शिक्षण उपसंचालक.

पुणे विभाग, पुणे - १ यांचे कार्यालय

दिनांक : 11 SEP 2002

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे

विषय : प्रथम मान्यता, प्रेरणा माध्य. विद्या. आंबेगाव बुद्रु ता. हवेली जि. पुणे

संदर्भ : १. आपले पत्र क्रमांक शिक्षण/माध्य/ह-४/प्र. मा/०२-०३ दि. २/९/२००२
२. शा.प.क्रमांक मशाशा-१००२/[२८६/२०००] माशि-१ दि. २८/५/२००२
३. क्र. माध्य-३[१४] नमाशा/मान्यता/पुवि/२००२ दि. १७/८/२००२

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यांत येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२ व ३.३ अन्वये वनिता प्रेरणा मंडळ, धानकवडी ता. हवेली जि. पुणे संस्थेच्या प्रेरणा माध्यमिक विद्या. आंबेगाव बुद्रु जि. पुणे. माध्यमिक शाळेच्या इयत्ता आठवी च्या वर्गास २० ०० - २००१ या शैक्षणिक वर्षासाठी जून २० ०० पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींची पूर्तता अधिन राहून देण्यांत येत आहे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करित आहे किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यांत यावा.

## विना अनुदान

१. संस्थेने स्वतःच्या मालकीची शैक्षणिकदृष्ट्या योग्य व पुरेशा इमारत उपलब्ध करुन घ्यावी.
२. मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तींची नेमणूक करावी.
३. स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करुन घ्यावी.
४. स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी.
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घ्यावे.
६. पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन घ्यावा.
७. स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन घ्यावी.
८. शालेय फी चे दर मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.
९. शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०. कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणी नुसार वेतन अदा करावे.
११. शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२. विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३. तपासणी अहवालातील सूचनांची पूर्तता करावी.
१४. पालक शिक्षक संघाची स्थापना करावी.
१५. विद्यार्थ्यांसाठी संगणक सुविधा उपलब्ध करावी.
१६. विद्यार्थी संख्या वाढवावी.
१७. सोबतच्या त्रुटींची पूर्तता करण्याच्या अटीवरच सदरची प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

मूळ प्रतीवर शिक्षण उपसंचालक यांची स्वाक्षरी आहे.

26/9/03
आ.क्र. 4/8

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१ करिता

प्रत :
मुख्याध्यापक, प्रेरणा माध्य. विद्या. आंबेगांव बुद्रु ता. हवेली जि. पुणे.

२. निवडनस्ती

मोघी/......